# बालविहार :: मराठी श्लोक व प्रार्थना

प्रार्थना: नमस्ते शारदे देवी वीणा पुस्तक धारिणी ।
विद्यारंभ करिष्यामी प्रसन्ना भव सर्वदा ॥

१ प्रभाते मनी राम चिंतीत जावा । पुढे वैखरी राम आधी वदावा ॥
सदाचार हा थोर सांडू नये तो । जनीं तोचि तो मानवी धन्य होतो ॥

२ नेत्री दोन हिरे प्रकाश पसरे अत्यंत ते साजिरे ।
माथां शेंदुर पाझरे, वरि बरे दूर्वांकुराचे तुरे ॥
माझे चित्त विरे, मनोरथ पुरे, देखोनि चिंता हरे ॥
गोसावीसुत वासुदेव कवि रे त्या मोरयाला स्मरे ॥

३ मोरया मोरया गोड हे नाम तुझे । कृपा सागरा हेंचि माहेर माझे ॥
तुझी सोंड बा वाकुडी एकदंता । मला बुद्धी दे मोरया गूणवंता ॥

४ उपासनेला दृढ चालवावे । भुदेव संतांसि सदा लवावें ॥
सत्कर्म योगें वय घालवावे । सर्वांमुखी मंगल बोलवावे ॥

५ जयाच्या रथा एकची चक्र पाहीं । नसे भूमि आकाश आधार कांहीं ॥
असे सारथी पांगुळा ज्या रथासी । नमस्कार त्या सूर्य नारायणासी ॥

६ कैलासराणा शिव चंद्रमौळी । फणींद्र माथा मुकुटीं झळाळी ॥
कारुण्यसिंधू भवदुख हारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥

७ मना सज्जना भक्ति पंथेचि जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ॥
जनीं निंद्यते सर्व सोडोनि द्यावें । जनी वंद्य ते सर्व भावें करावें ॥

८ पडे खालती जें नभांतून पाणी । जसे सागरातेंच जाते मिळोनी ॥
नमस्कार कोणाही देवास केला । तरी अंति तो पोचतो केशवाला ॥

९ ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे । त्या त्या ठिकाणी निजरुप तुझे ॥
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी । तेथे तुझे सद्‌गुरु पाय दोन्ही ॥

१० प्रारंभी विनती करु गणपती विद्यादयासागरा ।
अज्ञानत्व हरुनि बुद्धि मति दे आराध्य मोरेश्वरा ॥
चिंता क्लेश दरिद्र दुःख अवघें देशांतरा पाठवी ।
हेरंबा गणनायका गजमुखा भक्तां बहू तोषवी ॥

११ शुभं करोति कल्याणं आरोग्यं धनसंपदा ।
शत्रुबुद्धिविनाशाय दीपज्योतिर्नमोऽस्तु ते ॥
दिव्या दिव्या दिपत्कार, कानीं कुंडल मोतीहार ।
दिव्याला पाहून नमस्कार, दिवा जळो तुळशीपाशीं ।
माझा नमस्कार सर्व देवांपाशीं ॥